**CNR No.MHSI01000517-2020** भास्कर वि. किरण

## निशाणी ६९ खालील आदेश

अपेलंट यांनी रिस्पॉडेंट नं. २(१) यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी विलंबमाफीचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जावर रिस्पॉडेंट नं. २ यांनी म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे. अपेलंट व रिस्पॉडंट यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अपेलंटचे अर्जामध्ये कथन की, रिस्पॉडेंट नं. २(१) रेश्मा रामचंद्र तेली ह्या दि. २४/११/२०२२ रोजी मरण पावलेल्या आहेत. त्या मरण पावल्याची माहिती अपिलार्थी यांना नव्हती. अपिलार्थी यांना मयताच्या मृत्युबाबतची नोंद कोणत्या गावातील जन्ममृत्यु नोंद प्राधिकरण अधिकारी अथवा ग्रापंचायतीत घातली याची कल्पना नसल्याने कागदपत्रे मिळवण्यास उशीर झाला. मयताच्या कायदेशीर वारसांची कागदपत्रे योग्य वेळेत न मिळाल्यामुळे वारस दाखल करण्यास विलंब झालेला आहे. रिस्पॉडेंट नं. २(१) यांना दोन कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे ते दोन कायदेशीर वारस आपिलामध्ये समविष्ट करणे आवश्यक आहे. तरी तो अर्ज मंजूर करावा ही विनंती केली आहे.

३. रिस्पॉडंट यांनी अर्जावर म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे की, अर्ज खोटा व खोडसाळ स्वरूपाचा असल्याने नामंजूर करावा.

४. अपेलंट यांचा अर्ज, त्यावरील रिस्पॉडंट याचे म्हणणे याचा विचार करता अपेलंट यांनी रिस्पॉडेंट नं. २(१) यांचे वारस वेळेत अपिलामध्ये समाविष्ट

केलेले नाही. अपेलंट यांचे अर्जामध्ये कथन की मयता बाबत माहिती उपलब्ध झाली नव्हती त्यामुळे वेळेत वारस दाखल करता आलेले नाहीत. या कारणांचा विचार करता रिस्पॉडेंट नं. २(१) यांचे वारस अपिलाकामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे अपिलाचा अंतिम गुणदोषावर निकाल होण्यासाठी अपेलंट यांना संधी देणे योग्य व न्यायाचे होणारे आहे. त्यामुळे अपेलंट याने दिलेले कारण योग्य व संयुक्तिक असल्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१. अपेलंट यांचा निशाणी ६९ वरील अर्ज हा मंजूर करण्यात येत आहे.

२. अपिलंट यांना आदेशीत करण्यात येते की, रिस्पॉडेंट नं. २(१) चे वारस अपिलामध्ये १४ दिवसांच्या आत अपिलामध्ये दुरूस्ती व अपिलाची प्रत हजर करावी. तसे न केल्यास अर्ज हा आपोआप रद्द समजण्यात येईल.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR

Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2025.12.03 16:59:10 +0530

( एस. एस. इंदलकर )
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग – ओरोस.

सिंधुदुर्ग–ओरोस.
दिनांक : ०३/१२/२०२५